Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,**
**दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,**
**www.unishivaji.ac.in**

**विद्यार्थी विकास विभाग**
**Phone – (0231) 2609175, 2609475**
**Email: dsw@unishivaji.ac.in**

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/२६५ दि. २०/०१/२०२५

प्रति,
मा. अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक,
सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय :— शिवाजी विद्यापीठ "शिवस्पंदन" सांस्कृतिक कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन नोंदणीबाबत.**
संदर्भ :— या विभागाचे संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/२५५ दि. ०६/०१/२०२५ रोजीचे पत्र

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भित विषय पत्रान्वये "शिवस्पंदन" सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करणेत येणार असल्याचे कळविणेत आलेले आहे. या अनुषंगाने सॉफ्टवेअरमधून सन २०२४—२०२५ या वर्षाकरीता शिवस्पंदन सांस्कृतिक कार्यक्रमाची प्रवेशिका ऑनलाईन पध्दतीने भरावयाची आहे. शिवाजी विद्यापीठ शिवस्पंदन सांस्कृतिक कार्यक्रम २०२४—२०२५ च्या अनुषंगाने खालील बाबींची नोंद घेवून आपल्या अधिविभागातील विद्यार्थ्यांचा संघ बनवून शिवस्पंदन कार्यक्रमामध्ये सहभागी व्हावे.

१. शिवस्पंदन सांस्कृतिक कार्यक्रम प्रवेशिका भरणेबाबतची ऑनलाईन लिंक खालीलप्रमाणे आहे.
   लिंक : https://sukapps.unishivaji.ac.in/suk_dept_app/#/login
२. सदर लिंकवर क्लिक केल्यानंतर डाव्या बाजूला Department क्लिक करुन त्यामध्ये Shivspandan ला क्लिक कल्यानंतर फॉर्म ओपन होईल.
३. फॉर्म ओपन झाल्यानंतर सर्वप्रथम आपल्या अधिविभागाच्या संघाकरीता एका किंवा दोन संघव्यवस्थापक किंवा सांस्कृतिक समन्वयक यांची नोंद करावयाची आहे.
४. सांस्कृतिक समन्वयकांची नोंद केल्यानंतर तेथेच विद्यार्थ्यांची नोद करावयाची आहे.
५. एका विद्यार्थ्यांची नोंद करुन त्यांचे सहभागी कलाप्रकार (Solo/Group) निवडून माहिती पुर्ण भरल्यानंतर Save बटनावर क्लिक करायचे आहे व त्यानंतर दुसऱ्या विद्यार्थ्याचा भरावयाचा आहे. अशा पद्धतीने सर्व संघातील विद्यार्थ्यांची नोंदणी करायाची आहे.
६. सर्व विद्यार्थ्यांची माहिती भरल्यानंतर माहिती तपासून घ्यावी व शेवटी Lock बटनावर क्लिक करावी.
७. एकदा Lock केल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येत नाही.
८. **सदर ऑनलाईन प्रवेशिका भरण्याची अंतिम मुदत सोमवार दि. २७/०१/२०२५ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत आहे.**

तरी कृपया वरील बाबींची नोंद घेवून जास्तीत जास्त अधिविभागांनी व विद्यार्थ्यांनी स्पर्धेमध्ये सहभागी व्हावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू

प्र.संचालक
विद्यार्थी विकास